महाराष्ट्र शासन

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२६, मुंबई, दि. ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र. संकीर्ण-३६२५/प्र.क्र.१९८/ई-१४३६७८०/ पोल-३, दि. १३/०३/२०२६.

**विषय :-** AI Powered Investigation platform सॉफ्टवेअर व इतर अनुषंगिक बाबींकरिता प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र. संकीर्ण-३६२५/प्र.क्र.१९८/ई-१४३६७८०/पोल-३, दि. १३/०३/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०३१३१६०५२५०९२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
Kalpana Kisan Lokhande
Date: 17-03-2026
12:21:56

( कल्पना लोखंडे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.) (अति.कार्य.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
कार्यासन अधिकारी, का.क्र.२१.

प्रत,

अपर पोलीस महासंचालक( का.व सु.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक ( का.व सु.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महानिरीक्षक (नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (विशेष शाखा).

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

AI Powered Investigation platform सॉफ्टवेअर व इतर अनुषंगिक बाबींकरिता प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**गृह विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-३६२५/प्र.क्र.१९८/ई-१४३६७८०/पोल-३.**

**दुसरा मजला मंत्रालय,**

**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,**

**मुंबई - ४०० ०३२.**

**दिनांक : १३.३.२०२६.**

**संदर्भ :** (१) शासन निर्णय, गृह विभाग, क्र.संकीर्ण-०८२३/प्र.क्र.१३०/पोल-३, दि.१६.२.२०२४ व दि.१६.३.२०२५.

(२) शासन आदेश क्रमांक : एचडी ३१०१३१३१/३/२०२५/पोल-३, दि.२५.४.२०२५.

(३) मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखालील शक्ती प्रदत्त समितीची दि.१०.१२.२०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

(४) विशेष पोलीस महानिरीक्षक (का. व सु.), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२१/७२७२/AI-SPV/७८/२०२४, दि.१२.२.२०२६.

प्रस्तावना :

राज्य पोलीस दलास कृत्रिम बुध्दीमत्तेचा (Artificial Intelligence) वापर करुन कायदा अंमलबजावणीचे कार्य अधिक प्रभावीपणे करता यावे, म्हणून “Maharashtra Research and Vigilance for Enhanced Law Enforcement Ltd.(MARVEL)” ही शासकीय कंपनी स्थापन करण्यात आली आहे. उक्त कंपनी ही थेट राज्य शासनाच्या (गृह विभाग) अधिपत्याखाली आहे. उक्त कंपनीची दिनांक २२.४.२०२४ रोजी कंपनी अधिनियम २०१३ याखाली नोंदणी करण्यात आली.

२. पोलीस अधिक्षक,नागपूर ग्रामीण, संचालक, भारतीय व्यवस्थापन संस्था, नागपूर आणि पिनाका टेक्नॉलॉजीज खाजगी मर्या. हे मार्वलचे संचालक आहेत. तसेच, पोलीस अधीक्षक,नागपूर (ग्रामीण), हे उक्त कंपनीचे पदसिध्द मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. मार्वलचे कार्यालय हे भारतीय व्यवस्थापन संस्था,नागपूर यांच्या आवारात स्थित आहे. मार्वलच्या स्थापनेपासून प्रथम पाच वर्षांकरिता रु. ४,२०,००,०००/- (रुपये चार कोटी वीस लाख फक्त) प्रतीवर्ष याप्रमाणे भागभांडवल म्हणून अनुदान देय आहे. मार्वल या शासकीय कंपनीच्या कामांची विविधता आणि तिची संभाव्य क्षमता लक्षात घेता तिला गृह विभागापुरते मर्यादित न ठेवता मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील शक्ती प्रदत्त समितीच्या (Empowered Committee) अधिपत्याखाली आणण्यात आले, याबाबतचा शासन निर्णय दि.२५.५.२०२५ अन्वये रोजी निर्गमित करण्यात आला.

३. पोलीस अधिक्षक,नागपूर (ग्रामीण)-नि-मुख्य कार्यकारी अधिकारी मार्वल कं. यांनी Al Powered Investigation platform सॉफ्टवेअर व इतर अनुषंगिक बाबींकरिता दि.१४.११.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे निधी मिळण्याचा प्रस्ताव सादर केला. सदरचा प्रस्ताव तांत्रिक मान्यतेसाठी माहिती तंत्रज्ञान विभागास पाठविण्यात आला होता. त्यावर माहिती तंत्रज्ञान विभागाने गृह विभागाच्या प्रस्तावास तांत्रिक समितीच्या अभिप्रायानुसार खालील अटी व शर्ती सह तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे -

(1) The procurement authority/entity shall ensure vendor neutrality, transparency and adherence to statutory and administrative compliance for procurement and to execute procurement under the ambit of existing laws, rules, regulations and procurement policy.
(2) It shall be the responsibility of the procurement authority/entity to ensure that required administrative and financial approvals are obtained from the competent authority.
(3) This technical sanction is for the broad specifications for the proposed hardware and software. The tentative cost suggested in the proposal may however be treated as a reference for the procurement since the same has been suggested by MARVEL which itself is a technical entity.
(4) The implementation authority may explore the technical feasibility of hosting the software platforms in MSDC (Maharashtra State Data Centre).

४. मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील शक्ती प्रदत्त समितीच्या दि.१०.१२.२०२५ रोजीच्या नागपूर येथील बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

1. Empowered Committee approved the implementation of the Project on pilot basis for a total cost of INR 2 Crores. A sum of INR 1.5 Crores will be allocated to MARVEL on nomination basis for implementation of the project in Nagpur Rural district. The balance amount will be used by Home Department for carrying out compilation of court cases and other related resource materials for using the same to further enable the Al platform being developed.
2. The intellectual property rights (IPR) of the Al Investigation platform developed will be provided to Government of Maharashtra on non-commercial basis along with all knowledge resource, thereby enabling Government of Maharashtra to use this platform across the state for scale up as well as other suitable state projects.
3. For the hosting and deployment of the platform, competitive, reasonable prices will be discovered through tender process.
4. CCTNS databases should be seamlessly integrated with the platform through APIs.
5. To ensure proper utility for field officers it was directed that assistance from experts identified by Home Department will be taken for domain knowledge.
6. The Home Department will issue a Government Resolution as per the Empowered Committee approval.
7. Before state-wide scale up, the outcomes of the pilot project being implemented in Nagpur Rural will be presented before the Empowered Committee.
8. During state-wide scale-up proper procurement procedures will be followed, ensuring vendor neutrality and transparency.

शक्ती प्रदत्त समितीने उपरोक्तप्रमाणे दिलेल्या मान्यतेनुसार पोलीस महासंचालक कार्यालयाकडून दि.१२.२.२०२६ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त प्रस्तावानुसार प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

**शासन निर्णय :**

मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील शक्ती प्रदत्त समितीच्या दि.१०.१२.२०२५ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार AI Powered Investigation platform सॉफ्टवेअरच्या मुलभूत पायाभूत सुविधा आणि सानुकुलनाकरीता सॉफ्टवेअर अनुषंगिक खरेदी यासाठी एकूण रुपये २,००,००,०००/- (अक्षरी दोन कोटी फक्त) इतक्या अंदाजित खर्चाच्या या प्रकल्पाच्या प्रायोगिक तत्त्वावर अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे. पोलीस अधिक्षक,नागपूर (ग्रामीण) यांच्या कार्यक्षेत्रात MARVEL या शासकीय कंपनीमार्फत AI Powered Investigation Platform तयार करण्यासाठी रुपये १,५०,००,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी पन्नास लाख फक्त) व न्यायालयीन खटले आणि इतर संबंधित संसाधन सामग्रीचे संकलन करण्यासाठी गृह विभागाकरिता AI प्लॅटफॉर्म अधिक सक्षम व विकसित करण्यासाठी उर्वरित रु.५०,००,०००/-(अक्षरी पन्नास लाख फक्त) इतकी रक्कम अनुज्ञेय राहील.

२. प्रस्तावित रुपये २,००,००,०००/- (अक्षरी दोन कोटी फक्त) इतका निधी AI Powered Investigation platform सॉफ्टवेअरच्या मुलभुत पायाभुत सुविधा आणि सानुकुलनाकरीता सॉफ्टवेअर अनुषंगिक खरेदी यासाठी मागणी क्र.बी-१, २०५५ पोलीस, ००,११५ पोलीस दलाचे आधुनिकीकरण, (०१) विविध तंत्रज्ञान विकास प्रकल्प, (०१) (०१) विविध तंत्रज्ञान विकास प्रकल्प (कार्यक्रम), या लेखाशीर्षांतर्गत ५२-यंत्रसामग्री व साधनसामग्री या उद्दीष्टाखाली त्या-त्या वर्षाच्या मंजूर अनुदानातून खर्च करण्यास सहमती देण्यात येत आहे.

३. AI Powered Investigation Platform Software करिता रुपये १,५०,००,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी पन्नास लाख फक्त) इतका निधी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी पोलीस अधिक्षक, नागपूर (ग्रामीण) यांना वितरीत करावा. उर्वरीत रु.५०,००,०००/-(अक्षरी पन्नास लाख फक्त) इतक्या निधीतून न्यायालयीन खटले व इतर संबंधित संसाधनाकरिता AI Platform विकसीत करावे.

४. उक्त निधी कोषागारातून आहरण करण्यासाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना “नियंत्रण अधिकारी” व त्यांच्या अधिपत्याखालील आहरण व संवितरण अधिकाऱ्याला “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे. उपरोक्त निधी विहीत केलेल्या कामासाठी खर्च करण्यात यावा व खर्च करण्यात आलेल्या रकमेची उपयोगिता प्रमाणपत्रे वेळोवेळी शासनास सादर करावी.

५. सदर शासन निर्णय, वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२, दि.१७.०४.२०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-पहिला, उपविभाग-दोन, महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम, १९६५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार व अ.क्र. २७ (अ), नियम क्र.७६ अन्वये

प्रशासकीय विभागाला असलेल्या अधिकारानुसार व मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या (HPC) दिनांक १०.१२.२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०३१३१६०५२५०९२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAJENDRA TANAJI BHALWANE

Digitally signed by RAJENDRA TANAJI BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac44551976931d275814 8ccaa24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD514095659 A6CDFAC856815518DCD188C23A, cn=RAJENDRA TANAJI BHALWANE
Date: 2026.03.13 16:06:56 +05'30'

**(रा. ता. भालवणे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. राज्यमंत्री (गृह) ग्रामीण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री (गृह) शहरी यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मुख्य सचिव, यांचे वरिष्ठ स्वीय सहायक. मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
७. प्रधान सचिव (विशेष) यांचे स्वीय सहायक
८. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०. अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अभिलेख कक्ष, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
१२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१४. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.
१५. वित्त विभाग, व्यय-७/ वित्तीय सुधारणा.
१६. कक्ष अधिकारी, अर्थ-१, गृह विभाग.
१७. निवडनस्ती, पोल-३.